# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990






लातूर वर्ष ३ रे अंक १६३ वा शुक्रवार दि.२४ नोव्हेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# दिव्यांग पदवीधरांसाठी स्वतंत्र महाविद्यालय, बच्चू कडू यांच्या आग्रहानंतर सीएम शिंदे यांच्या बैठकीत महत्त्वाचे निर्णय...!




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यभरातील दिव्यांगांच्या विविध प्रश्नांसंदर्भात बैठक पार पडली. या बैठकीमध्ये 'दिव्यांग कल्याण विभागाच्या' 'दिव्यांगांच्या दारी अभियान' राज्यस्तरीय समितीचे अध्यक्ष व मुख्य मार्गदर्शक आमदार बच्चू कडू, दिव्यांग प्रतिनिधी गौरव मालक, ज्ञानेश्वर ठाकरे, इतर दिव्यांग प्रतिनिधी यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव उपस्थित होते.यावेळी दिव्यांगांच्या दृष्टीने विविध निर्णय झाले. मुख्यमंत्र्यांनी सर्व विभागांना महत्त्वाच्या सूचना दिल्या. राज्यातील सर्व एसटी बसस्थानकांमध्ये दिव्यांगांसाठी १० टक्के स्टॉल्स आरक्षित ठेवण्यासह, 'स्वाधार योजनेच्या' धर्तीवर दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी योजना तयार करावी आणि शासकीय नोकऱ्यांमध्ये खऱ्या दिव्यांगांना संधी मिळावी, यासाठी दिव्यांग प्रमाणपत्र पडताळणीची प्रणाली सुरु करावी असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. कोणते निर्णय झाले..? राज्यातील सर्व एसटी बसस्थानकांमध्ये दिव्यांगांसाठी १० टक्के स्टॉल्स आरक्षित ठेवण्यासह, 'स्वाधार योजनेच्या' धर्तीवर दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी योजना तयार करावी आणि शासकीय नोकऱ्यांमध्ये खऱ्या दिव्यांगांना संधी मिळावी, यासाठी दिव्यांग प्रमाणपत्र पडताळणीची प्रणाली सुरु करावी असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिले. 'परिवहन महामंडळ' अंतर्गत असलेल्या ऑर्डीनरी स्लीपर बस मध्ये दिव्यांगांना सवलत देण्यासंदर्भात तात्काळ निर्णय घ्यावा. 'राज्य सरकार' अंतर्गत असलेले संकेतस्थळ दिव्यांगांच्या दृष्टीने सुगम्य करण्याबाबत धोरणात्मक अंमलबजावणी करावी. सर्वच शासकीय विभागांनी दिव्यांगांचे विषय गांभीर्याने घेऊन त्यांच्यासाठी असलेल्या योजना, कार्यक्रम गरजूंपर्यंत पोहोचवून त्याचा त्यांना लाभ मिळावा यासाठी आवश्यक तो सर्वतोपरी सहाय्य करण्याची ग्वाहीदेखील मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. शासकीय नोकऱ्यांमधील दिव्यांगांच्या आरक्षणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना देतानाच, विभागनिहाय अनुशेषाची आकडेवारी सादर करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. मूक-बधीर दिव्यांग व्यक्तींना वाहन परवाने देण्यासाठी नियमात दुरुस्ती आवश्यक असून त्यासाठीचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्याची कार्यवाही करावी. दिव्यांगांच्या विविध प्रकारातील पदवीधरांच्या शिक्षणासाठी स्वतंत्र महाविद्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या. शासकीय विभागांमध्ये मानधनावरील कंत्राटी पदे भरताना दिव्यांगांना त्यात आरक्षण देण्याच्या प्रस्तावाची तपासणी करण्याच्या सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी दिल्या. दहावी-बारावीमधील दिव्यांग विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी ज्या शाळांमध्ये प्रवेश आहे, त्याच ठिकाणी परीक्षा केंद्र देण्याच्या नियमाची अंमलबजावणी करावी तसेच 'स्थानिक स्वराज्य संस्थांबरोबरच' जिल्हा, तालुका, मोठ्या शहरांमध्ये रहदारीला अडथळा होणार नाही, अशा ठिकाणी 'गटई कामगारांप्रमाणे' दिव्यांगांना व्यवसायासाठी स्टॉल्स देण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.या निर्णयांबद्दल दिव्यांग स्तरातून समाधान व्यक्त केलं जात असताना, बैठकीनंतर बच्चू कडू यांनी ' सकाळला' प्रतिक्रिया दिली.दिव्यांग मंत्रालयाच्या निर्मितीनंतर झालेली ही बैठक अत्यंत प्रभावी असून, राज्यभरातील दिव्यांगांना याचा मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे. धोरणात्मक कृतिशील कार्यक्रम अस्तित्वात आल्याने अनेक वर्षांच्या आमच्या लढ्याला अखेर यश मिळत आहे. याचा आनंद असल्याचं बच्चू कडू यांनी 'सकाळ'शी बोलताना सांगितलं.

# क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा लातूर जिल्हा दौरा



लातूर :- राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे २४ नोव्हेंबर २०२३ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. ना. बनसोडे यांचे २४ नोव्हेंबर रोजी सकाळी ६.३० वाजता लातूर येथे आगमन होईल व शकुंतला निवासस्थान येथे आगमन होईल. सकाळी ८ वाजता ते मोटारीने चाकूरकडे प्रयाण करतील. सकाळी ९ वाजता चाकूर येथे सराफा लाईन येथील जिजाऊ मोबाईल शॉपीच्या उद्घाटन समारंभास ते उपस्थित राहतील. सकाळी ९.२० वाजता चाकूर येथून उदगीर तालुक्यातील वाढवणा बु. गावाकडे प्रयाण कातील. सकाळी ९.४५ वाजता वाढवणा बु. येथील सदगुरु संत बाळूमामा यांच्या पालखी दर्शनास उपस्थित राहतील. क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. बनसोडे यांच्या हस्ते सकाळी १०.०५ वाजता मौजे डांगेवादी-वाढवणा बु. मोड येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्ते कामांचे भूमिपूजन होईल. दुपारी १२ वाजता मौजे हंगरगा-क्षेत्रफळ मोड येथे रा.मा.२४९ ते हंगरगा-क्षेत्रफळ रस्ता कामाच्या भूमिपूजन कार्यक्रमास ते उपस्थित राहतील. दुपारी २ वाजता मौजे रावणगाव येथे मोघा ते रावणगाव रस्ता कामाच्या भूमिपूजन सोहळ्यास ते उपस्थित राहतील. उदगीर येथील राज-राजेश्वरी मंदिरासमोर दुपारी ४ वाजता ना. बनसोडे यांच्या उपस्थितीत रा.मा.६३ ते चवळे तांडा, मल्लापूर ते मल्लापूर तांडा रस्ता कामाचे भूमिपूजन होईल. सायंकाळी ६ वाजता जळकोट येथे इजिमा-५४ ते जिल्हा हद्द ते हिप्परगा रस्ता कामाच्या भूमिपूजन सोहळ्यास ते उपस्थित राहतील. सायंकाळी ६.३० वाजता जळकोट येथे शेलदरा-सोरगा-वडगाव-होकर्णा-वांजरवाडा ते रा.मा. २५१ ते इजिमा-५४ रस्ता कामाच्या भूमिपूजन सोहळ्यास ते उपस्थित राहतील. तसेच सोयीनुसार जळकोट येथून लातूरकडे प्रयाण करतील.

# सचिन पायलट यांच्याविषयी पंतप्रधानांची पुन्हा सहानुभूती; म्हणाले, एक गुर्जरांचा मुलगा...



नवी दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजस्थानमध्ये पुन्हा एकदा विधानसभा निवडणुकीच्या शेवटच्या दिवशी काँग्रेसवर निशाणा साधला. काँग्रेस आणि गहलोत सरकावर पंतप्रधानांनी ताशेरे ओढत राजेश पाटलट यांचा उल्लेख करुन सचिन पायलट यांचं कौतुक केलं.गांधी कुटुंबावर निशाणा साधताना पीएम मोदींनी राजेश पायलट आणि सचिन पायलट यांच्यावर काँग्रेसने अन्याय केल्याचा ठपका ठेवला आहेत. त्यांनी सलग दुसऱ्या दिवशी यासंदर्भात भाष्य केलं. ते म्हणाले की, काल मी काँग्रेसच्या शाही परिवारावर काही प्रश्न उपस्थित केले होते. त्यामुळे तीर निशाण्यावर लागला आणि अर्ध्या तासात संपूर्ण काँग्रेस हादरली.पंतप्रधान पुढे म्हणाले की, कानाकोपऱ्यातून काँग्रेसवाले चावचाव करत बाहेर पडले. त्यांना माहितंय, मोदींनी अशी गोळी चालवीय की काँग्रेसचं जगणं अवघड होऊन जाईल. राजेश पायलट यांच्याविषयी काँग्रेस विधानं करीत आहे आणि पत्रकार परिषदा घेत आहे. काँग्रेस पूर्ण ताकदीने खोटं बोलत आहे की, काँग्रेसने कधीच पायलट यांचा अपमान केला नाही. परंतु खऱ्या प्रश्नांची उत्तरं ते देत नाहीयेत. कोल्ड ड्रिंकनंतर आता कोका-कोलाची चहा मार्केटमध्ये एन्ट्री; 'ऑनेस्ट टी'च्या नावाने विकणार चहा मोदी म्हणाले, सचिन पायलट यांचा अपमान आम्ही केला नाही, असं काँग्रेस सांगत असली तरी मी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरं ते देत नाहीत. त्यांना माझ्या प्रश्नांची त्यांना उत्तरं द्यावीच लागतील. गुर्जरांचा जेवढा अपमान काँग्रेसने केला आहे तो पहिल्या पिढीनेसुद्धा बघितला आणि आणि आजची पिढीसुद्धा बघत आहे.

# महाआवास अभियानाच्या अंमलबजावणीतून लाभार्थ्यांच्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण होणार ग्रामविकास व पंचायत राज मंत्री गिरीष महाजन

## महाआवास अभियान राज्यस्तरीय कार्यशाळा शुभारंभ व पुरस्कार वितरण सोहळा

मुंबई/ प्रतिनिध :- प्रत्येकाच्या आयुष्यात स्वत:चे घर असावे, हे स्वप्न असते. गरीब, समाजाच्या शेवटच्या घटकातील व्यक्ती यांना तर घरकुल म्हणजे एक दिव्य स्वप्न असते. ही स्वप्नपूर्ती करण्यासाठी केंद्र व राज्य शासन घरकुलांच्या अनेक योजना राबविते. या योजनांच्या समन्वयातून राज्य शासनाने महाआवास अभियानाचा शुभारंभ केला आहे. महाआवास अभियानाच्या अंमलबजावणीतून लाभार्थ्यांच्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्यात येणार आहे, असे प्रतिपादन ग्रामविकास व पंचायत राज मंत्री गिरीष महाजन यांनी आज केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण सभागृहात महाआवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय कार्यशाळा शुभारंभ व सन २०२१-२२ चे पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मंत्री श्री. महाजन बोलत होते. कार्यक्रमास व्यासपीठावर ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, ग्रामसडक योजनेचे सचिव के. पी पाटील, कोकण विभागाचे विभागीय आयुक्त महेंद्र कल्याणकर, नागपूर विभागाच्या विभागीय आयुक्त श्रीमती विजयालक्ष्मी बिदरी, राज्य व्यवस्थापन कक्षाचे संचालक डॉ. राजाराम दिघे उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सर्वांसाठी घरे स्वप्न असल्याचे सांगत मंत्री गिरीष महाजन म्हणाले, समाजातील अंत्योदय पर्यंत योजनांचा लाभ देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. गरीबांना गॅस जोडणी, नळ जोडणी, वीज जोडणी, शौचालयाची सुविधा देण्यात येत आहे. शासन समाजातील शेवटच्या घटकाला पुढे आणण्यासाठी विविध योजना राबविते. या योजनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी यंत्रणांची आहे. पंडीत दिनदयाल उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेत ५० हजार रूपयांचे अर्थसहाय्य सध्या देण्यात येते. यामध्ये १ लाख रूपयापर्यंत वाढ करण्याची मागणी करण्यात आली आहे. लवकरच ही मागणीही पूर्ण होणार आहे.

मंत्री श्री. महाजन पुढे म्हणाले, अन्न, वस्त्र व निवारा या मूलभुत गरजांपैकी निवारा देण्याचे पुण्याचे काम यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामार्फत होत आहे. त्यामुळे प्रत्येकाने गभीरतेने या कामाकडे लक्ष देवून काम पूर्ण करावे. घरांचे बांधकाम दर्जेदार करावे. केवळ घरकुलच नाही, तर अन्य योजनांचा लाभसुद्धा घरकुल लाभार्थ्याला देण्यात यावा. स्वच्छतेचे महत्व सांगत मंत्री श्री. महाजन म्हणाले, स्वच्छतेचा संस्कार हा शालेय जीवनापासूनच रूजायला पाहिजे. आपला देश प्रत्येक क्षेत्रात अभिमानास्पद कामगिरी करीत आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेने १० व्या स्थानावरून पाचव्या स्थानावर झेप घेतली आहे. मात्र स्वच्छतेच्या बाबतीत अधिक काम करावे लागणार आहे. हगणदारीमुक्तीसाठी सक्तीने कार्रवाई करावी लागणार आहे, याबाबत यंत्रणेने कार्यवाही करावी. दर्जेदार घरकुल बांधकामासाठी गोवंड्यांना प्रशिक्षण देण्याच्या सूचनाही मंत्री महोदयांनी यावेळी केल्या.

प्रास्ताविकात प्रधान सचिव एकनाथ डवले म्हणाले, महाआवास अभियान २० नोव्हेंबर २०२३ पासून ३१ मार्च २०२४ पर्यंत राबविण्यात येणार आहे. जागा नसलेल्या कुटूंबांना घरकुले देण्यामध्ये महाराष्ट्र राज्याची कामगिरी देशात अव्वल आहे. या अभियानाच्या माध्यमातून बांधकाम अपूर्ण असलेली, मंजूर असलेली मात्र बांधकाम सुरू नसलेली घरकुले पूर्ण करण्याचे आवाहनही त्यांनी केले. महाआवास अभियानबाबत सादरीकरण राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण संचालक डॉ. दिघे यांनी केले. कार्यक्रमादरम्यान अभियान पुस्तिका, मागील वर्षाची अभियान गौरव गाथा पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच अभियानाच्या माहिती पोस्टरचे विमोचनही करण्यात आले. याप्रसंगी मोदी आवास योजनेच्या लाभार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात घरकुल मंजूरीपत्र देण्यात आले.

कार्यक्रमाला विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, उपायुक्त (विकास), ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, गटविकास अधिकारी, विभागीय प्रोग्रॅमर, डाटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक आदी उपस्थित होते.

सन २०२१-२२ चे महाआवास अभियान पुरस्कार

विभाग : केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) सर्वोत्कृष्ट विभाग प्रथम नागपूर, द्वितीय नाशिक, तृतीय पुणे, राज्यपुरस्कृत योजनेत कोकण प्रथम, नागपूर द्वितीय, पुणे



विभागाने तृतीय क्रमांक पटकाविला. जिल्हे : केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मध्ये प्रथम भंडारा, द्वितीय जळगाव व तृतीय गोंदिया हे जिल्हे असून राज्य पुरस्कृत योजनेत सिंधुदुर्ग प्रथम, भंडारा द्वितीय व गडचिरोली तृतीय आहे. तालुके : केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मध्ये प्रथम कुडाळ जि. सिंधुदुर्ग, साकोली जि. भंडारा द्वितीय व गगनबावडा जि. कोल्हापूर तृतीय तसेच राज्य पुरस्कृत योजनेत लाखनी जि. भंडारा प्रथम, कुडाळ जि. सिंधुदुर्ग द्वितीय व कळवण जि. नाशिक तृतीय क्रमांकाचा पुरस्कार पटकाविला आहे.

ग्रामपंचायत : राज्य पुरस्कृत योजनेत संयुक्त प्रथम क्रमांक लोरे ता. वैभववाडी जि. सिंधुदुर्ग व जिंती ता. पाटण जि. सातारा, द्वितीय क्रमांक खलंग्री ता. रेणापूर जि. लातूर, तृतीय क्रमांक खोलापूर ता. भातकुली जि. अमरावती, केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) यामध्ये प्रथम क्रमांक निंबर्गी ता. द. सोलापूर जि. सोलापूर, द्वितीय गोळवण ता. मालवण जि. सिंधुदुर्ग व तृतीय क्रमांक पोही, ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती.

बहुमजली इमारत या घटकात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मध्ये ताडगांव ता. मोहाडी जि. भंडारा, द्वितीय लोणी बु ता. रिसोड जि. वाशिम, तृतीय दीपकनगर ता. तुळजापूर जि. धाराशिव तसेच राज्यपुरस्कृत योजनेत प्रथम येरखेडा ता. कामठी जि. नागपूर, द्वितीय नेवपूर ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर आणि तृतीय क्रमांक गणेशपूर ता. रिसोड जि. वाशिम या ग्रामपंचायतीने पटकाविला आहे.

सर्वोत्कृष्ट गृहसंकुले या घटकात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मध्ये प्रथम भांबुर्डी ता. माळशिरस जि. सोलापूर, द्वितीय मजरा (रै) ता. वरोरा जि. चंद्रपूर, तृतीय बुधला ता. कळमेश्वर जि. नागपूर, राज्यपुरस्कृत योजनेत प्रथम रायताळे ता. जव्हार जि. पालघर, द्वितीय मोहकळ ता. खेड जि. पुणे, तृतीय क्रमांक शेंद्रे ता. जि. सातारा या ग्रामपंचायतीने पटकाविला आहे.

अधिकारी व कर्मचारी यांना विशेष पुरस्कार : राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माणमधील राज्य समन्वयक डॉ. संघरत्न सोनावणे, वास्तु विशारद परमेश्वर शेलार, लेखा सहायक अंकिता राऊळ यांना मिळाला आहे.

विभागीय प्रोग्रॅमर पदासाठी मोहेसीन अहमद अयुब अली जि अमरावती, जिल्हा प्रोग्रॅमर पदासाठी आशिष चकोले जि. भंडारा, विवेक गोहील जि. जळगांव, चंद्रकांत पाटील जि. कोल्हापूर, जिल्हा डेटा एंन्ट्री ऑपरेटर पदासाठी प्रफुल्ल मडामे जि. भंडारा, सुमीत बोरसे जि. जळगांव, राजेंद्र कवडे जि. कोल्हापूर, तालुका डेटा एंन्ट्री ऑपरेटर पदासाठी सानिका चव्हाण ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग, हर्षल मेंढे ता. साकोली जि. भंडारा, उमाकांत पडवळ ता. गगनबावडा जि. कोल्हापूर, सतिश पवार ता. पारोळा जि. जळगांव, दीपक शिंगणे ता. दे.राजा जि. बुलढाणा, किसन मांजरमकर ता. भोकर जि. नांदेड, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता पदासाठी राकेश चलाख ता. आरमोरी जि. गडचिरोली, करण पाटील ता. चाळीसगांव जि. जळगांव, भूषण ठाकरे ता. मालेगांव जि. नाशिक, परिक्षीत चव्हाण ता. जत जि. सांगली, उमेश श्रीरामे ता. मुखेड जि. नांदेड, पवन म्हातारमारे ता. बाळापूर जि. अकोला यांना पुरस्कार मिळाल आहे. तसेच महाआवास अभियानातील विविध घटकांसाठी सर्वोत्कृष्ठ जिल्ह्यांना विशेष पुरस्कार देण्यात आले.

## संपादकीय....

# पदोन्नतीचे पाहा..

क्रिकेट विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाचा संघ भारतास किरकोळीत धूळ चारत असताना त्या ऐतिहासिक क्षणी पंतप्रधान तेथे उपस्थित होते. ..कोणास पनवती वगैरे ठरवण्याची उठाठेव करण्यापेक्षा स्वत:च्या नावे काही राजकीय पराक्रम लागेल आणि आपली पदोन्नती होईल हे राहुल गांधी यांनी पाहावे; त्यात अधिक शहाणपण आहे. विज्ञानवादाची कास धरणारे, आयआयटी–आयआयएम्स उभारणारे, भाक्रा–नानगल बांधणारे, जमिनीतून खनिज तेल उसळताना पाहून त्या प्रवाहाच्या वर्णनार्थ ‘वसुधारा’ असा सुंदर शब्द जन्मास घालणारे, उत्कृष्ट लेखक, आपले कडवे टीकाकार प्रतिस्पर्धी निवडून यावेत यासाठी जातीने लक्ष घालणारे खरे लोकशाहीवादी पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या पणतूने एखाद्याचे वर्णन ‘पनवती’ असे करावे यातून केवळ मूर्खपणाचे दर्शन होते असे नाही, तर त्याचबरोबर प्रचलित जनभावनेच्या लाटेत वाहून जाण्याची वृत्ती, अवैज्ञानिकता तसेच स्वत:चे कथानक स्वत: रचण्याचा बौद्धिक तसेच शारीरिक आळस इत्यादी द्रुगुणही या शब्दनिवडीतून दिसून येतात. हे यांनी नि:संशय टाळायला हवे होते. क्रिकेट विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाचा संघ भारतास किरकोळीत धूळ चारत असताना त्या ऐतिहासिक क्षणी पंतप्रधान तेथे उपस्थित होते. भारतीय संघ जिंकला असता तर साहजिकच कोणत्याही चतुर राजकारण्याप्रमाणे त्या विजयाचा परावर्तित प्रकाश त्यांच्याही चेहऱ्यावर पडावा असे प्रयत्न झाले असते आणि भाजप समर्थक वा भक्तगणांनी त्यांच्यामुळे आपण जिंकलो इतक्या बिनडोकपणे युक्तिवाद केले असते. याच परिस्थितीचा व्यत्यास आपण पराभूत झाल्यामुळे समोर आला. आणि विजयीवीरांचे कौतुक करण्याच्या उदात्त हेतूने मैदानस्थळी योग्य वेळी हजर झालेल्या पंतप्रधानांवर भारतीय खेळाडूंचे सांत्वन करण्याची वेळ आली. तेव्हा विजयाचे राजकारण झाले असते हे जर खरे असेल तर पराजयाचेही राजकारण केले जाणार हेही तितकेच खरे. भारत विजयी झाला असता तर पंतप्रधानांची उपस्थिती शुभशकुनी म्हणून गौरवली गेली असती. तसे झाले नाही. भारत अपयशी ठरला. त्यामुळे या अपयशाचा अपशकुनही या सध्याच्या कमालीच्या राजकीयभारित वातावरणात त्यांना चिकटवला जाणार हे उघड आहे. पण असली बिनडोकी कृती समाजमाध्यमांतील रिकामटेकडया वाचाळवीरांवर सोपवणे इष्ट. ते काम हा वर्ग इमानेइतबारे करीत असताना राहुल गांधी यांनी हा शब्दप्रयोग उसना घेण्याची गरज नव्हती. असा शब्दप्रयोग कोणत्याच व्यक्तीसाठी, कोणीही, कधीही वापरता नये. मग ती व्यक्ती देशाची पंतप्रधान असो वा अन्य कोणी. याचे कारण ‘पनवती’, ‘पांढऱ्या पायाचा’, ‘अशुभ’, ‘नाट लावणारा’ इत्यादी घृणास्पद शब्दप्रयोग ते करणाऱ्याची वर्णवर्चस्ववादी तसेच अवैज्ञानिक मानसिकता दाखवून देतात. म्हणजे वैज्ञानिक मूल्यांच्या आणि मानवी बौद्धिक क्षमतेच्या परिसीमेचे दर्शन घडवत तयार करण्यात आलेल्या उच्च दर्जाच्या विमानांचे स्वागत करताना त्यांस मिरची/लिंबू बांधणे वा उपग्रह प्रक्षेपणाआधी इष्टदेवतांचे आशीर्वाद(?) घेत शुभशकुनाची इच्छा बाळगणे हे जितके अवैज्ञानिक तितकेच अपशकुनाची चिंता बाळगणे वा एखाद्यास अपशकुनी म्हणणे हे अशास्त्रीय आणि अतार्किक. शकुन, अपशकुन या कल्पनाच मुळात व्यक्तीच्या अपरिपक्व बुद्धीचे दर्शन घडवतात आणि त्यांतून त्यांच्यातील आत्मविश्वासाचा अभाव दिसून येतो. ‘‘हायड्रोजनचे दोन आणि ऑक्सिजनचा एक रेणू कोणत्याही कुमुहूर्तावर एकत्र आले तरी त्यातून पाणी तयार होणारच,’’ असे वि. दा. सावरकर म्हणत. राहुल गांधींस सावरकर नकोसे. तेव्हा त्यांनी एपीजे अब्दुल कलाम यांचे उदाहरण स्मरावे. राष्ट्रपतीपदी निवड झाल्यावर राष्ट्रपती भवनात राहावयास कोणत्या मुहूर्तावर जाणार असे विचारता कलाम यांनी आपल्यासाठी सर्व ग्रहदशा सारख्याच असे उत्तर दिले. राहुल गांधी गोल्फ खेळतात किंवा काय हे माहीत नाही. हा खेळ खेळत नसले तरी त्यांनी विख्यात गॉल्फर गॅरी प्लेयर यांचे एक वाक्य लक्षात ठेवावे. ‘‘मी जितका अधिकाधिक कसून सराव करतो, तितका अधिकाधिक नशीबवान ठरतो,’’ असे प्लेयर म्हणतात. हे विधान राजकारणासही लागू होते. सबब एखाद्यास पनवती वा अपशकुनी म्हणण्याचा मूर्खपणा करू इच्छिणाऱ्या मूर्खांची आपल्याकडे कमी नाही, हे खरे असले तरी राहुल गांधी यांनी त्यात एकाची भर घालण्याचे कारण नाही.आणि दुसरे असे की असा अपशकुनी असण्याचा आरोप राहुल गांधींवर उलटू शकतो. कारण राहुल गांधी यांनी पक्षाची धुरा स्वत:च्या खांद्यावर घेतली आणि काँग्रेसचा ऱ्हास सुरू झाला. सबब राहुल गांधी हे काँग्रेससाठी पनवती असे कोणी म्हटल्यास त्यात गैर ते काय? तेव्हा एखाद्याशी राजकीय मतभेद आहेत, त्यास पराभूत करण्यासाठी तुम्ही कितीही तळमळत आहात इत्यादी खरे असले तरी त्यासाठी असा शब्दप्रयोग करण्याची गरज नाही. एखाद्याचे एखादे यश हा योगायोग असू शकतो. यशातील सातत्य राखावयाचे असेल तर सतत कष्ट करण्यास पर्याय नाही. हे सत्य जितके भारतीय आणि प्रतिस्पर्धी ऑस्ट्रेलिया संघास लागू होते तितकेच ते आणि भाजप या राजकीय पक्षांसही लागू होते. तेव्हा भाजपच्या यशाचा, आणि विशेषत: त्यातही मोदी यांच्या यशाचा, कितीही संताप राहुल गांधी यांस असला तरी तो व्यक्त करण्यासाठी अशा शब्दाची निवड सर्वथा अयोग्य. मोदी असो वा अहमदाबादेतील स्टेडियमवर विश्वचषक अंतिम सामन्यास जमलेले बहुसंख्य असोत. यातील फारच कमी जण उत्तम दर्जाच्या क्रिकेटचा आस्वाद घेण्यासाठी तेथे जमले होते. ‘अशा’ सर्वांस रस होता तो भारतमातेच्या मस्तकावर विश्वविजेतेपदाचा मुकुट ठेवला जाणे पाहण्यात. त्यातही या मुकुटाची प्राणप्रतिष्ठापना निवडणुकांच्या तोंडावर साक्षात पंतप्रधानांनी करताना पाहणे हा तर देवदुर्लभ योग म्हणायचा. तो साधण्यासाठी अनेक जण देव पाण्यात घालून बसले होते हे खरे. त्या मुहूर्तासाठी पंतप्रधानही भारतीय क्रिकेटपटूंच्या वस्त्ररंगात आले होते हेही खरे. पण तरी ही पुण्याई फळली नाही. आपण हरलो. त्याचे खापर अपशकुनावर फोडणे म्हणजे ऑस्ट्रेलियन संघाच्या कष्टांस, सातत्यास कमी लेखणे. ते करण्याचा राहुल गांधींस काय अधिकार? भाजपचे यश ज्याप्रमाणे त्या पक्षाच्या नेत्यांकडून बारा महिने चोवीस तास केल्या जाणाऱ्या प्रयत्नांत आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या धोरणीपणात आहे त्याचप्रमाणे काँग्रेसचे अपयश हे या सगळयाच्या अभावात आहे. म्हणून त्या अपयशासाठी राहुल गांधींचा शकुन काढणे जितके अयोग्य तितकेच भारतीय क्रिकेट संघाच्या पराभवासाठी कोणास पनवती ठरवणे अश्लाघ्य. भले राहुल गांधींस पप्पू ठरवण्यात त्यांच्या विरोधकांनी पातळी सोडली असेल, भले एखाद्या स्त्रीचे वर्णन परदेशी जर्सी गाय असे अत्यंत असभ्य शब्दांत एखाद्याने केले असेल, भले विरोधी पक्षीय खासदाराच्या महिला जोडीदारासाठी एखाद्याने ‘५० कोटींची गर्लफ्रेंड’ असा क्षुद्र शब्दप्रयोग केला असेल तरी या सगळया विरोधात संतापून एखाद्याचे वर्णन पनवती असे करणे अजिबात समर्थनीय ठरत नाही.

# रुपेरी पडद्याचं क्रिकेटप्रेम

कदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचा ज्वर शिगेला पोहा–`चला होता. भारत हा क्रिकेटप्रेमींचा देश म्हणून ओळखला जातो. टी–२०सारखा झटपट क्रिकेटचा आविष्कार उदयास आल्यानंतर भारतीयांच्या क्रिकेटप्रेमाला अधिकच उधाण आलेले दिसून आले. इंटरनेटचा प्रसार झाला नव्हता त्या काळातही कसोटी सामने, एकदिवसीय सामने टीव्हीच्या पडद्यावर रात्री जागून पाहणा–यांची संख्या भारतात मोठी होती. या क्रिकेटप्रेमाची रुपेरी पडद्याला भुरळ पडली नसती तरच नवल ! हिंदी चित्रपटांचा इतिहास पाहिल्यास क्रीडाविश्वावर आधारित अन्य चित्रपटांच्या तुलनेत क्रिकेटवर बनवलेल्या चित्रपटांची संख्या सर्वाधिक आहे. यातील बरेचसे चित्रपट हे क्रिकेटच्या महान खेळाडूंचे जीवनपट आहेत. याशिवाय क्रिकेटच्या काल्पनिक कथांवर आधारित चित्रपटही बनवले गेले. क्रिकेटवर बनलेल्या चित्रपटांचीही सर्वाधिक चर्चा होते. क्रिकेटच्या थीमवर बनलेल्या ‘लगान’ या सुपरहिट चित्रपटाचे कथानकही काल्पनिक होते.खरे तर चित्रपट आणि क्रिकेट यांचे नाते अनेक दशके जुने आहे. भारतात क्रिकेट या खेळाची आवड इतकी आहे की आपल्याकडील अनेक जण परदेशात जाऊन भारतीय संघाला सपोर्ट करतात. या खेळाने समाजातील भेदाभेदाची दरी दूर करण्यात मोठी भूमिका बजावली आहे. कारण प्रत्येक जाती– धर्माचे खेळाडू क्रिकेट खेळतात आणि पाहतातही! त्यामुळेच क्रिकेटवर अनेक चित्रपट बनले आणि बनवले जात आहेत. १९५९ पासून आतापर्यंत क्रिकेटवर आधारित सुमारे तीन डझन चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. यापैकी ‘लगान’, ‘जन्नत’ आणि धोनीचा बायोपिक हे तीन चित्रपट सुपरहिट ठरले. तर काई पो चे, सचिन, फेरारी की सवारी आणि ‘८३’ यांनाही पसंती मिळाली. त्याच वेळी यापैकी अर्धा डझन चित्रपट जेमतेम आपला खर्च वसूल करू शकले आणि उर्वरित चित्रपटांना प्रेक्षकांनी नाकारले. पडद्यावरची क्रिकेटची आवड अजूनही थंडावलेली नाही. आज २०२३ मध्ये क्रिकेट अथवा क्रिकेटपटूंवर आधारित जवळपास अर्धा डझन चित्रपट रांगेत आहेत. केवळ पुरुष क्रिकेटपटूंवरच बायोपिक बनवले गेले नाहीत तर तापसी पन्नूने भारतीय महिला क्रिकेटपटू मिताली राजच्या जी–वनावर आधारित ‘शाबास मिठू’ चित्रपटात भूमिका साकारली होती. १९५९ मध्ये पहिला चित्रपट १९५९ मध्ये क्रिकेटच्या कथेवर आलेला ‘लव्ह मॅरेज’ हा या श्रेणीतील पहिला चित्रपट मानला जातो. देव आनंद आणि माला सिन्हा यांनी या चित्रपटात अभिनय केला होता. यामध्ये देव आनंद यांनी क्रिकेटरची भूमिका साकारली असून क्रिकेटमुळेच माला सिन्हा त्याच्या प्रेमात पडते, असे कथानक आहे. यानंतरच्या काळात डझनभर चित्रपट बनले आणि बनत राहिले. पण, २००१ मध्ये रिलीज झालेला आमिर खानचा ‘लगान’ हा क्रिकेटवर आधारित चित्रपटांमध्ये माईलस्टोन ठरला. हा चित्रपट व्हिक्टोरियन युगावर केंद्रित आहे ज्यामध्ये क्रिकेटला राष्ट्रवादाशी जोडले गेले होते. ‘मदर इंडिया’ आणि ‘सलाम बॉम्बे’ नंतर ऑस्करसाठी नामांकन मिळालेला ‘लगान’ हा तिसरा भारतीय चित्रपट ठरला आहे! २०१६ मध्ये आलेला ‘एम. एस. धोनी द अनटोल्ड स्टोरी’ हा भारतीय क्रिकेट संघाचा यशस्वी माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीचा बायोपिक आहे. क्रिकेटवर बनलेला हा दुसरा सर्वांत यशस्वी चित्रपट मानला जातो. नीरज पांडे दिग्दर्शित या चित्रपटाला अफाट लोकप्रियताही लाभली आणि तिकिटबारीवरही त्याने चांगला व्यवसाय केला.



क्रिकेटपटूंवर बनवलेला बायोपिक क्रिकेटच्या लोकप्रियतेमध्ये सर्वांत मोठे योगदान त्या खेळाडूंचे आहे, ज्यांनी आपल्या संघाला विजय मिळवून देण्यासाठी अनेक वेळा शर्थीचे प्रयत्न केले. त्यामुळेच या महान खेळाडूंच्या जीवनावर चित्रपट बनवले गेले. यामध्ये केवळ त्यांचा खेळच चित्रित केला गेला नाही तर खेळाची उंची गाठण्यासाठी केलेली त्यांची धडपडही दाखवण्यात आली. उदाहरणार्थ, महेंद्रसिंग धोनीवर बनलेल्या चित्रपटात त्याचा संघर्ष आणि वैयक्तिक आयुष्य खूप छान दाखवण्यात आले होते. २०२१ मध्ये रिलीज झालेला कपिल देव यांचा बायोपिक ‘८३’ ही त्यांच्या आयुष्यावर आधारित आहे. या चित्रपटात कपिल देवची कर्णधारपदाची रणनीती आणि १९८३ चा विश्वचषक विजय दाखवण्यात आला होता. पण, मोहम्मद अझरूद्दीनवर आधारित ‘अझहर’ (२०१६) हा चित्रपट प्रेक्षकांनी नाकारला होता. हा चित्रपट अझरूद्दीनच्या जीवनावर आधारित होता, ज्याच्यावर मॅच फिक्सिंग करून टीम इंडियाचा पराभव केल्याचा आरोप होता. महान फलंदाज सचिन तेंडुलकरवर बायोपिकही बनवण्यात आला होता, ज्याचे नाव होते ‘सचिन द बिलियन ड्रीम’. सचिनला क्रिकेटमधील देव मानले जात असूनही हा चित्रपट तिकिटबारीवर चालला नाही! खरंतर हा फीचर फिल्म नसून डॉक्युमेंट्री होती. आता येत्या काळात महान क्रिकेटर लाला अमरनाथ यांच्यावरही बायोपिक बनणार आहे. याशिवाय सौरव गांगुलीच्या बायोपिकचे कामही सध्या सुरू आहे. क्रिकेट चित्रपटांचे काल्पनिक कथानक केवळ बायोपिकच नाही तर काल्पनिक क्रिकेटच्या कथाही प्रेक्षकांना खूप आवडल्या. १९८४ मध्ये रिलीज झालेल्या ‘ऑलराऊंडर’ची कथा अजय नावाच्या पात्रावर आधारित होती, ज्याची त्याच्या मोठ्या भावामुळे भारतीय कसोटी संघात निवड होते. याला देशातील पहिल्या पूर्णपणे क्रिकेटवर आधारित चित्रपटाचा दर्जा मिळाला आहे. भारतीय संघाने १९८३ मध्ये विश्वचषक जिंकला, त्यानंतर १९८४ मध्ये ‘ऑलराऊंडर’ रिलीज झाला. शाहिद कपूर आणि मृणाल ठाकूर यांचा चित्रपट ‘जर्सी’ हा साऊथ चित्रपटाचा रिमेक होता. यामधील नायक क्रिकेटरच्या भूमिकेत दिसला होता. याचे दिग्दर्शन गौतम तिन्ननुरी यांनी केले होते. या चित्रपटाला चांगले रिव्ू मिळाले पण तो फ्लॉप ठरला. २००५ मध्ये आलेला ‘इकबाल’ हा चित्रपट एका मूकबधिर खेड्यातील मुलाची कथा आहे,ज्याचा उद्देश वेगवान गोलंदाज बनणे आणि क्रिकेट संघासाठी खेळणे असतो. या चित्रपटात नसिरुद्दीन शहा एका प्रशिक्षकाच्या भूमिकेत दिसले. ते इकबालला म्हणजेच श्रेयस तळपदेला त्याच्या क्रिकेट प्रवासात मदत करतात. या क्रीडा चित्रपटाला सामाजिक विषयावरील सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. ‘पटियाला हाऊस’ हा २०११ साली प्रदर्शित झालेला क्रिकेट ड्रामा चित्रपट होता, ज्यामध्ये शॉन टेट, अँड्र्यू सायमंड्स, हर्शेल गिब्ज, किरॉन पोलार्ड, नासिर हुसैन आणि संजय मांजरेकर यांसारख्या अनेक आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी काम केले होते. या चित्रपटाच्या कथेत अक्षय कुमारने एका ब्रिटिश भारतीयाची भूमिका साकारली होती. ‘काय पो चे’ या चित्रपटात दिवंगत अभिनेता सुशांत सिंग राजपूतने पहिल्यांदा काम केले होते. त्यात तीन मित्रांची कहाणी दाखवली होती. ‘फेरारी की सवारी’ (२०१२) देखील क्रिकेटच्या क्रेझवर आधारित होता. यामध्ये शर्मन जोशी मुख्य भूमिकेत होता. आता तर ओटीटीवरही क्रिकेटच्या कथांचे भांडवल केले जात आहे. ‘कौन प्रवीण तांबे’ हा असाच एक चित्रपट आहे. १९५९ मध्ये रिलीज झालेल्या ‘लव्ह मॅरेज’मध्ये देव आनंद आणि माला सिन्हा होते. कुमार गौरव आणि रती अग्निहोत्री यांनी १९८४ च्या ‘ऑलराऊंडर’मध्ये काम केले होते. १९९० मध्ये आलेल्या ‘अव्वल नंबर’ चित्रपटात देव आनंद, आमिर खान आणि आदित्य पांचोली हे कलाकार होते. रिमी सेन आणि कुणाल कपूर यांनी २००७ मध्ये आलेल्या ‘हॅटट्रिक’ चित्रपटात काम केले होते. २००८ मध्ये रिलीज झालेला ‘जन्नत’ हा इम्रान हाश्मी आणि सोनल चौहान अभिनित चित्रपट होता. तर २००९ मध्ये आलेल्या ‘दिल बोले हडिप्पा’ चित्रपटात राणी मुखर्जी आणि शाहिद कपूर मुख्य भूमिकेत होते. २०११ मध्ये आलेल्या ‘पटियाला हाऊस’ चित्रपटात अक्षय कुमार, ऋषी कपूर, डिंपल कपाडिया आणि अनुष्का शर्मा होते. शरमन जोशी आणि बोम्मन इराणी यांनी २०१२ मध्ये आलेल्या ‘फेरारी की सवारी’ या चित्रपटात काम केले होते. २०१६ मध्ये आलेल्या ‘अजहर’ चित्रपटात इम्रान हाश्मीने मुख्य भूमिका साकारली होती. २०१६ मध्ये रिलीज झालेला ‘एम. एस. धोनी द अनटोल्ड स्टोरी’ हा सुशांत सिंग राजपूतचा चित्रपट होता. रणवीर सिंगने २०२१ च्या ‘८३’ मध्ये काम केले होते.

# मैत्री खरीखुरी की भयकारी?

अमेरिका व चीन यांच्यातही मैत्री म्हणजे तात्पुरता तह करणाऱ्या दोन देशांची सलगी आहे व या मैत्रीमुळे भारताने व जपानने चिंतेत बुडून जाण्याचे काहीही कारण नाही. दोन शक्तिशाली राष्ट्रांमधील ‘गट्टी’ला विशिष्ट हितसंबंधांची किनार आहे. त्यामुळेच ती मैत्री अत्यंत मर्यादित स्वरूपाची आहे.अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग अमेरिकेत सॅन फ्रॅन्सिस्को येथे १५ नोव्हेंबरला एकमेकांना भेटले. त्यांच्यात विविध विषयांवर विस्तृत चर्चाविमर्श झाला. वस्तुतः अमेरिका आणि चीन गेली पाच वर्षे परस्परांच्या विरोधात आरोप–प्रत्यारोप करीत आहेत. परस्परांना कोंडीत पकडण्याचे प्रयत्न करीत आहेत. पण याच दोन राष्ट्रांचे प्रमुख एकमेकांशी मनमोकळी चर्चा करण्यासाठी एकत्र आले. हे जगाला आश्चर्यचकित करणारे प्रकरण आहे, यात काही शंका नाही. हे दोन सुंदोपसुंद आता एकमेकांचे मित्र म्हणून वावरणार का? या दोघांमधली मैत्री भारत, जपान, तसेच तैवान, फिलिपिन्स, व्हिएतनामला अस्वस्थ करणारी आहे. अमेरिका आपली पाठराखण करणे सोडून देईल का, हा प्रश्न या देशांना अस्वस्थ करीत आहे. म्हणूनच अमेरिका–चीन मैत्री कितपत खरी, या प्रश्नावर विचार करायला हवा.मुळात ‘आशिया प्रशांत क्षेत्र आर्थिक सहकार्य परिषद’ सॅन फ्रॅन्सिस्को येथे चालू होती. एकवीस सदस्य राष्ट्रे या परिषदेच्या निमित्ताने एकत्र जमली होती. या सदस्यांच्या आर्थिक सहकार्यालाच अमेरिका– चीन मैत्री सुरूंग लावणार का, हा प्रश्न केवळ भारत–प्रशांत क्षेत्रालाच नव्हे तर युरोप व प. आशिया या क्षेत्रांनाही सतावताना दिसतो.चीनच्या मस्तवाल व साम्राज्यवादी धोरणांमुळे अवघ्या जगात विषादाची लहर पसरली असून आशियात जपानला एकाच वेळी चीन व रशिया या देशांकडून धोका आहे. भारत सुपात नव्हे, जात्यातच भरडला जात आहे. युरोपात युक्रेनचा प्रश्न अजूनही धगधगणारा, तर पश्चिम आशियात हमासनामक दहशतवादी संघटना विरुद्ध इस्त्राईल यांच्यात संघर्ष पेटला आहे.या पृष्ठभूमीवर चीन, रशिया, उत्तर कोरिया या हुकूमशाही राष्ट्रांमधली दोस्ती वणवा पेटवणारी आहे. आता इराण व तुर्कस्तान आणि कदाचित म्यानमारचे सत्ताधारीही चीन–रशिया यांचे पालखीवाहक बनले तर भविष्य किती भयकारी बनेल, हा प्रश्न कळीचा बनला आहे. अर्थात अमेरिका व चीन या राष्ट्रांच्या कर्णधारांना एकत्र येण्याची निवड का भासली असावी? ऑक्टोबर महिन्यातच चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी वॉशिंग्टनला पोचले ते सदर कर्णधारांच्या चर्चाविमर्शाची पूर्व आणि पूर्ण योजना आखण्यासाठी! चीनमध्ये भले शी जिन पिंग यांची एकाधिकारशाही राज्यशकट चालवित असेल; पण जून २०२३मध्येच चीनचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री क्विन गँग आणि चीनच्या सैन्याचे रॉकेट फोर्स कमांडर जनरल ली युचाओ यांना पदमुक्त करण्यात आले. ऑगस्ट २०२३ मध्ये संरक्षणमंत्री ली शांघफे यांनाही घरी पाठविण्यात आले. चीनची अर्थव्यवस्था मंदीत अडकली आहे.सगळ्या जगाला वेढणारी भूपृष्ठीय व सागरी मार्गांची साखळी आव्हानांनी ग्रस्त आहे. सैन्यबळ कितीही प्रचंड



असले तरी आंतरराष्ट्रीय व अंतर्गत आव्हानावर यशस्वी मात करता येईल का, ही काळजी चिनी शासकांना हैराण करीत आहे.दस्तुरखुद्द अमेरिका चीनशी तुल्यबळ आहे. कांकणभर अधिकच शक्तिमान आहे. पण चीनमुळे धास्तावलेल्या, चीनच्या कर्जविळख्यात अडकून पडलेल्या विविध देशांना एकाच वेळी प्राणवायू पुरवता येईल का? रशिया विरुद्ध युक्रेन या संघर्षातली जटिलता वाढली आहे. रशिया अमेरिकेच्या निर्बंधाना पुरून उरला आहे. त्यात पश्चिम आशियालाही आग लागली आहे.या वातावरणात अमेरिकी सत्ताधीशांमध्येच मतैक्य भंगले आहे. मंदीची झळ अमेरिकेच्या अर्थकारणालाही अस्वस्थ करीत आहे. तेव्हा चीनच्या व अमेरिकेच्या कर्णधारांनीही एकत्र यावे व काही ताणतणाव संपुष्टात आणावेत, हा उद्देश दोन्ही राष्ट्रांकडून मतैक्याचा ठरला तर ही निष्पत्ती स्वाभाविकच म्हटली पाहिजे. व्यापारवाढीचा हेतू अमेरिका व चीन या राष्ट्रांमधल्या संबंधात जे ताणतणाव उत्पन्न झाले आहेत, ते संपुष्टात यावेत यासाठी दोन राष्ट्रप्रमुखांनी हातमिळवणी करण्याचे ठरविले. वॉशिंग्टन व बीजिंग यांच्यात व्यापारवृद्धी व्हावी व त्या वृद्धीमुळे दोन्ही अर्थव्यवस्थांमध्ये मंदीऐवजी तेजी बहरावी हा हेतू आहे.अमेरिकी गुंतवणूकदारांनी पुन्हा चीनमध्ये गुंतवणूक करण्यास उत्साह दर्शवावा, अमेरिकेतले अत्याधुनिक तंत्रविज्ञान तसेच अत्यंत नवनव्या वस्तू व सेवा चीनला मिळतील, तर अमेरिकी भांडवलास व अत्याधुनिक तंत्रविज्ञानास बाजारपेठ मिळेल. विस्मयाची गोष्ट म्हणजे शी जिन पिंग जो बायडेन यांना म्हणाले, ‘जगावर आपणच दोघे अधिकार गाजवू हा मोह सोडून दिला पाहिजे!’या दोन राष्ट्रांच्या सैन्यांमधला संवाद पुनश्च सुरू करण्यास दोन्ही कर्णधारांनी हिरवा झेंडा दाखविला आहे. खरं म्हणजे २०२२ च्या ऑगस्टमध्ये अमेरिकेतल्या लोकप्रतिनिधीगृहाच्या सभापती नॅन्सी पेलोसी यांनी तैवानला भेट दिली, तेव्हा चीननेच संताप व्यक्त केला होता. चीनपासून तैवानची भूमी वेगळी आहे, या अमेरिकी धोरणाचा निषेध म्हणून दोन सैन्यांमधल्या सुखसंवादांना चीनने कुलूप लावले.आज मात्र याच चीनने प्रस्तुत वैचारिक विनिमयाला मान्यता दिली आहे. दोन देशांमधल्या पारस्परिक संबंधांना अर्थातच उजाळा मिळाला आहे. दोन शक्तिशाली राष्ट्रे यापुढे म्हणे कट्टीऐवजी गट्टी करणार आहेत. पण ही गट्टी ठराविक विषयांपुरती आहे.तैवानचे स्वातंत्र्य अमेरिकेने रेखांकित केले आहे. दोन राष्ट्रप्रमुखांमध्ये ज्या इमारतीत चर्चा चालू होती, त्या सभागृहाबाहेर अमेरिकी निदर्शक तिबेट व हाँगकाँग यांच्या स्वातंत्र्याची मागणी करीत होते, हेही विसरून चालणार नाही. अमेरिका व चीन यांच्यातही मैत्री म्हणजे तात्पुरता तह करणाऱ्या दोन देशांची सलगी आहे व या मैत्रीमुळे भारताने व जपानने चिंतेत बुडून जाण्याचे काहीही कारण नाही. जपानचे पंतप्रधान फ्युमिओ किशिया यांनी १६ नोव्हेंबरला चीनच्या अध्यक्षांना भेटून, चीन व रशिया या दोघांमधील लागेबांधे व चीनच्या (जपानच्या प्रांगणातल्या) सैनिकी हालचाली याबद्दलची नाराजी स्पष्टपणे व्यक्त केली. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांनी चीनमधल्या हुकूमशाहीवर निसंदिग्ध हल्ला चढविला, व चीननेही अमेरिकेचा सत्वर निषेध केला! चीनने जगातल्या सर्व सागरांमध्ये त्या त्या देशांचा मर्यादित अधिकार मान्य करावा व दक्षिण चीन सागरातली हडेलहप्पी एकाधिकारशाही त्याज्य समजावी, याचाही बायडेन यांनी पुनुरुच्चार केला.भारताच्या दृष्टिकोनातून सॅनफ्रॅन्सिस्कोला बायडेन व शी जिन पिंग यांच्यातल्या हातमिळवणीमुळे धास्ती बाळगण्याचे काहीही कारण नाही. हिंद–प्रशांत क्षेत्रातल्या भारताच्या भूमिकेवर ना बायडेन काही बोलले, ना शी जिन पिंग यांनी काही भाषण केले. भारताने या क्षेत्रात अमेरिका, ऑस्ट्रेलिया व जपान यांच्याशी वाढविलेली मैत्री व या मैत्रीमुळेच उभा राहिलेला चतुष्कोनी आकृतिबंध आता अधिक भक्कम होत आहे.ऑस्ट्रेलिया व भारत या दोन्ही देशांचे परराष्ट्रमंत्री तसेच संरक्षणमंत्री नुकतेच एकमेकांना भेटले व त्यांनी हिंदी महासागर तसेच प्रशांत महासागर सर्वांसाठी खुले राहावेत या मागणीचा व पारस्परिक सहकार्याचा गजर केला आहे. भारताप्रमाणेच उर्वरित तिन्ही देशांना सच्चे वैश्विकीकरण हवे आहे. प्रतिबंधरहित व्यापारवृद्धी हवी आहे आणि दक्षिण गोलार्धातल्या अल्पविकसित देशांचा मुक्तविकास हवा आहे. चीनची तथाकथित रेशीम मार्गाची व्यूहरचना पराजित व्हावी म्हणून पर्यायी मार्गिका बांधण्याला भारताप्रमाणेच ऑस्ट्रेलिया, जपान व अमेरिका कमालीचे उत्सुक आहेत.सन २०२०मध्ये गलवानच्या खोऱ्यात भारतीय जवानांनी ऐतिहासिक बहादुरी दर्शवून चीनला आव्हान दिले. भारत चीनच्या एकाधिकारशाहीशी झुंज घेऊ शकतो. हेच सन १९६२ नंतरच्या वर्षांमध्ये आणि खास करून सन २०१७नंतरच्या काळात सिद्ध झाले आहे. अमेरिका इस्त्राईलवर १९६७ पासून खुश आहे. कारण इस्त्राईल स्वतःच्या ताकदीवर अरबी दहशतवाद्यांना नामोहरम करू शकतो याची अमेरिकेला प्रचीती आली आहे.जग शक्तीची पूजा करते आणि मैत्रीचे सेतू बांधताना हा घटक महत्त्वाचा ठरतो. भारताने पांडवांचा आदर्श समोर ठेवून निरनिराळ्या राष्ट्रांशी भागीदारी करण्याचे ठरविले आहे. चीनच्या रुपातल्या वर्तमान कौरवांना उचित संदेश आपण दिला आहे. तेव्हा अमेरिका–चीन मैत्रीची भीती कशाला बाळगायची?

# मानसिक स्वास्थ्यासाठी आशावाद का महत्त्वाचा?

आशावादी माणसे आजारपणात वेगात बरी होतात तर निराश व्यक्तींना बरे होण्यास वेळ लागतो हे आता संशोधनातून पुरते सिद्ध झाले आहे, त्याविषयी डॉ. जान्हवी केदारे सहा महिन्यापूर्वी अशोकची गुडघ्याची मोठी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया झाली. त्याला ऑपरेशन व्हायच्या आधीच मनात अनेक विचार येत. मी नेहमीच कमनशिबी ठरलो आहे. नाहीतर चार भावंडांमध्ये मलाच का ऑपरेशन करावे लागते आहे? साधारणतः मी काहीही करायचे म्हटले की अडचणीच फार येतात. तसेच या ऑपरेशनच्या वेळेस झाले नाही म्हणजे पुरवले! नंतर तरी मला नीट चालता फिरता येईल का? नाही आले तर एवढे लाखो रुपये पाण्यात जातील. शस्त्रक्रिया यशस्वी झाली, पण शस्त्रक्रियेनंतर होणाऱ्या वेदना अशोकला सहन होईनात. फिजिओथेरपी करताना वेदनेने विव्हळे आणि त्याचे पालुपद सुरू होई, 'मी काही धड चालू शकेन असे वाटत नाही.' महेशचे हार्टचे ऑपरेशन ठरले. तोच त्याच्या बायकोला आणि मित्रांना समजावून सांगू लागला, अरे आता बायपास सर्जरी म्हणजे खूप भयंकर घटना राहिलेली नाही. मी माहिती काढली आहे, डॉक्टरांशी चर्चा केली आहे. उलट आपण वेळेवर ऑपरेशन करतो आहोत, हे चांगले. लवकर बरे होता येईल. पुढच्या महिन्या -दोन महिन्यात मी माझे सगळे रुटीन छान सुरू करेन, अगदी ऑफिसलासुद्धा नीट जायला लागेन. मला खात्री आहे की, सांगितलेल्या सूचना पाळल्या की मी पुनः ठणठणीत होईन. एका आजारपणाने खचून जायचे नाही. आयुष्यात अजून खूप गोष्टी करायच्या आहेत, त्याच्यासाठीच हे ऑपरेशन करतो आहे. चांगले तेच घडेल.ऑपरेशन दोघांचेही यशस्वी झाले. पण अशोकला बरे व्हायला फार वेळ लागला. वेदना सहन होत नसत, त्यामुळे तो चालायला नाखूश असे. म्हणे, 'एवढ्या मोठ्या ऑपरेशन नंतरही मी आजारीच राहिलो'. महेश मात्र म्हटल्याप्रमाणे ऑफिसला जाऊ लागला, सांगितलेले पथ्य, चालण्याचा व्यायाम आदी सर्व गोष्टी नियमितपणे करू लागला. असे का झाले? दोघेही चांगले बरे का नाही झाले? अशोकचे विचार अत्यंत निराशावादी, तर महेश प्रचंड आशावादी. दोघांच्या दृष्टिकोनातल्या ह्या फरकामुळे आजारातून बरे होण्याच्या प्रक्रियेवर परिणाम झालेला दिसतो. आशावाद म्हणजे मनातला हा विश्वास की, भविष्यात चांगल्या गोष्टी घडतील. अगदी अडचणीच्या वेळीदेखील असे वाटणे, 'आत्ता माझ्या मनासारखे घडत नसले तरी मला खात्री आहे की पुढे जाऊन मी परिस्थिती नक्की बदलू शकेन, सुधारू शकेन.' आशावाद मनाला खूप मोठी शक्ती देतो. येणाऱ्या अडचणींना आव्हान म्हणून स्वीकारण्याचे, त्यांनी दबून न जाण्याचे बळ देतो. जितके सकारात्मक आणि आनंदी आपण असू तितके आपले आयुर्मान वाढते, मनातली आशा शारीरिक आणि मानसिक आजारांपासून आपल्याला दूर ठेवते.प्रत्येकाच्या मनात आशा- निराशेचा खेळ सुरू असतो. परंतु काही व्यक्ती मनात सतत आशावादी राहतात आणि आयुष्यात अनेक गोष्टी प्राप्त करतात. या उलट निराशावादी विचारांचा पगडा सतत मनात असेल तर तितकेसे यश मिळत नाही. मनात निर्माण होणारा ताणतणाव, आयुष्यात येणारी कठीण संकटे, प्रतिकूल परिस्थिती सगळ्याला तोंड देताना मनातला आशावाद



मोठी मदत करतो. उदासपणा, चिंता, राग संताप, नोकरीतील कंटाळा, दैनंदिन आयुष्यातील संघर्ष, अनेक शारीरिक तक्रारी हे सारे आशावादी माणसापासून दूर जाते. या उलट त्याला जीवनात समाधान लाभते. शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य लाभते.आशा निराशेचा आपल्या आयुष्यावर होणारा परिणाम शास्त्रीय संशोधनाने दाखवून दिला आहे. शरीरातील अंतःस्रावांवर मनातल्या आशेचा परिणाम होतो. प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. पौंगडावस्थेतील मुलामुलींमध्ये मन आशावादी असेल तर उदासीनता, अतिचिंता यांचे प्रमाण खूप कमी राहते. तसेच शैक्षणिक यश मिळायला फार मदत होते. मध्यमवयीन आणि वृद्ध यांमध्येसुद्धा रक्तदाबासारखा आजार कमी प्रमाणात आढळतो, हृदयरोगाचे प्रमाण कमी होते. कुठल्याही वेदनेचे प्रमाण कमी होते. आजारातून लवकर बरे व्हायला मदत होते. तसेच कॅन्सरसारख्या दुर्धर रोगाशी सामना करण्याची शक्ती मिळते आणि आयुर्मान वाढते. एचआयव्ही एड्स सारख्या रोगामध्येसुद्धा आशेच्या जोरावर प्रकृती सांभाळता येते. महिलांमध्ये तर स्तनाच्या कर्करोगामध्ये मनातल्या आशेचा प्रकृतीवर खूप चांगला परिणाम झालेला दिसून येतो.स्वभावानेच आशावादी असलेल्यांचे बरे आहे! आपोआपच आरोग्य चांगले राहील, ते आयुष्यात यशस्वी होतील! स्वभावाने निराशावादी असलेल्यांना असे वाटू शकते. परंतु मन आशावादी बनवता येते. निराशेच्या मनोवस्थेतून आशेच्या दिशेने प्रवास करता येतो. माझ्याच बाबतीत असे घडते, असेच नेहमी घडत राहणार, माझ्या संपूर्ण आयुष्यावर नेहमी येणाऱ्या संकटाचा कायम परिणाम राहणार. असे सतत म्हणणारा निराशावादी माणूस मनात आशा कशी बाळगायची ते शिकू शकतो आणि यशस्वीतेकडे वाटचाल करू शकतो. त्यासाठी काही गोष्टी अंगिकाराव्या लागतात. मानसिक विकारांचा सामना करतानासुद्धा मनात आशावादी दृष्टीकोन निर्माण करायला शिकवले जाते. मनातल्या नकारात्मक विचारांना आव्हान देऊन, त्याजागी नवीन सकारात्मक विचारांचे रोपण करणे, अडचणींकडे त्रयस्थपणे बघायला शिकणे, संकटाशी सामना करताना माहिती मिळवणे, उपाय शोधणे, त्यासाठी आवश्यक त्याची मदत घेणे अशा विविध पद्धती शिकता येतात.रोज डायरी लिहिणे, त्यात आपल्याला आलेले चांगले अनुभव नोंदवणे, आपल्याला दिवसभरात ज्यांनी मदत केली त्यांची आठवण ठेवणे, त्यांच्याविषयी कृतज्ञता मनातल्या मनात व्यक्त करणे (अगदी बसमध्ये कोणी बसायला दिले तर त्याचीही आठवण मनाला प्रसन्न करते).

## किडनी ७५ हजार, लिव्हर ९० हजार...; शेतकऱ्यांनी सरकारला पाठवलं अवयवांचे रेट कार्ड, विरोधी पक्षनेत्याने शेअर केली पोस्ट



राज्यात यंदा बऱ्याचशा जिल्ह्यांमध्ये समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे अनेक ठिकाणी शेतकरी चिंतेत आहे. जनावऱ्यांच्या चाऱ्याचा प्रश्न देखील गंभीर बनत चालला आहे.यादरम्यान राज्याला दुष्ताळगृस्त जाहीर करा अशी मागणी विरोधीपक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. यासोबतच हिंगोलीतील दुष्काळगृस्त शेतकऱ्यांनी सरकारला पाठवलेल्या अवयवांच्या रेटकार्डवरून वड्डेटीवारांनी जोरदार टीका केली आहे. राज्यात सोयाबीन, कापूस हे पीकं गेली आहेत. मराठवाड्यात धरणात ३६ टक्के पाणी शिल्लक आहे. आपल्याला अजून सात महिने काढायचे आहेत. पिण्याचं पाणी नाही, शेती पिकत नाही. सरकारने राज्यात कर्जमाफी केल्याशिवाय शेतकरी वाचणार नाही असेही वडेट्टीवार म्हणाले आहेत.यापूर्वी विधानसभेचे विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत सरकारला धारेवर धरलं. शेतकऱ्यांनी युती सरकारला अवयवांचे रेट कार्ड पाठवलं असल्याचा उल्लेख करत विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर टीका केली आहे.वडेट्टीवार काय म्हणालेत?किडनी - ७५,०००/ १० नग लिव्हर - ९०,०००/ १० नग डोळे - २५,०००/ १० नग यासह शरीरातील इतर अवयवांचे रेट कार्ड काढून दुष्काळग्रस्त हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी कुटुंबांनी ते सरकारकडे पाठवले आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थिती किती गंभीर आहे आणि त्यामुळे कर्जाच्या डोंगराखाली दबलेला शेतकरी किती चिंतेत आहे ह्याचे भान महायुती सरकारला नाही. हेच शेतकरी जर आमदार खासदार असते तर त्यांच्याकरीता खोके देण्याची तयारी या सरकारने त्वरित दाखवली असती. पण दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी सरकारकडे निधी नाही. शेतकऱ्यांना तातडीच्या मदतीची गरज आहे हे आम्ही वारंवार सांगत आहोत. पण झोपेचं सोंग घेऊन शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष सरकार करत आहे, असे वडेट्टीवार म्हणाले आहेत .

## केंद्र सरकार लवकरच 'डीपफेक'विरोधात बनविणार नियम



नवी दिल्ली : केंद्र सरकारने 'डीपफेक' संदर्भात नुकतीच एक बैठक घेतली आहे. यामध्ये सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा सहभाग होता. या बैठकीत गुगल, फेसबुक, यूट्यूबसह अन्य ऑनलाइन प्लॅटफॉर्मही उपस्थित होती. या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले. त्यांनी सांगितले की, या बैठकीत चार महत्त्वाच्या मुद्द्यांवर एकमत झाले आहे. डीपफेक हा आज लोकशाहीसाठी नवीन धोका आहे. आणि त्यावर तातडीने कारवाई करण्याची गरज सरकारला वाटते.केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की, याबाबत केंद्र सरकार लवकरच नियम बनविणार आहे. तसेच, याविरोधात लोकांमध्ये जागरूकता वाढवणे खूप गरजेचे आहे, असे आम्हाला वाटते. डीपफेकमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आम्ही नियम बनवू. घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मसह पुढील बैठकी घेऊ. बैठकीत चार प्रमुख मुद्द्यांवर चर्चा झाल्याचे अश्विनी वैष्णव यांनी सांगितले. डीपफेक कसे शोधले जाऊ शकतात, लोकांना डीपफेक पोस्ट करण्यापासून कसे रोखले जाऊ शकते, अशा सामग्रीला व्हायरल होण्यापासून कसे रोखले जाऊ शकते आणि रिपोर्टिंग यंत्रणा कशी कार्यान्वित केली जाऊ शकते. या मुद्द्यांवर चर्चा झाली. कोणत्याही अॅप किंवा वेबसाइटवरील वापरकर्ते प्लॅटफॉर्म आणि अधिकाऱ्यांना डीपफेकबद्दल अलर्ट करू शकतील. जेणेकरून याबाबत कार्यवाही करता येईल. याबाबत जनजागृती करण्यासाठी सरकार, उद्योग आणि प्रसारमाध्यमे यांना एकत्रितपणे काम करावे लागेल, असे ते म्हणाले.


## मोडी लिपीतील कुणबी नोंदी शोधण्यासाठी रात्रीचा-दिवस! जळगाव नेऊरचे शिक्षक यांनी शोधल्या सुमारे २ हजार नोंदी



येवला : आपल्याला अवगत असलेले ज्ञान आणि कला समाजाच्या हितासाठी उपयोगात आली, तर नक्कीच आनंद होईल, या भावनेतून जळगाव नेऊर येथील शिक्षक सुरेश शेळके यांनी कुणबी नोंदी शोधण्यासाठी दिवाळीत मोठी मेहनत घेतली.त्यांच्या प्रयत्नातून सुमारे दोन हजार नोंदी सापडल्या असून, मराठा बांधवांना आता ओबीसीचे दाखले मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. शासनाने कुणबी नोंदी शोधण्यासाठी आदेश दिल्यानंतर अनेक शाळा व नगरपालिकेतही अनेक नोंदी मोडी लिपीत असल्याने त्याची माहिती उपलब्ध कशी करावी, हा पेच प्रशासनापुढे होता. मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेच्या जळगाव नेऊर शाळेतील शिक्षक सुरेश शेळके यांचे नाव पुढे आले.त्यांनीही ऐन सुट्टीत आपला वेळ देऊन विविध कार्यालयांतील कुणबी नोंदी तपासण्याचे काम केले. येवला शहर व तालुक्यातील विविध आस्थापनांमधील मोडी लिपीतील नोंदी तपासण्याचे काम करण्यासाठी प्रांताधिकारी बाबासाहेब गाढवे यांनी त्यांच्यावर जबाबदारी सोपवली व त्यांनी ती लीलया पार पाडली.शहराला ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा असल्याने पुरातन काळातील मोडी दस्तऐवज मोठ्या प्रमाणात आहेत. येथील नगरपरिषद कार्यालयात १८८८ ते १९३५ या कालावधीतील सर्व जन्म व मृत्यूच्या नोंदी मोडी लिपीत केल्या आहेत. शहरातील सर्व मराठी शाळांमधील विद्यार्थी प्रवेशाचे रेकॉर्ड १८४५ पासूनच्या नोंदींची जनरल रजिस्टर्स सध्या लक्कडकोट येथील मराठी शाळेत ठेवली आहेत. तहसील कार्यालयातील जन्म-मृत्यू नोंदींची रजिस्टर्स व ग्रामीण भागातील सुमारे दहा मराठी शाळांमधील विद्यार्थी प्रवेश जनरल रजिस्टर्स १८६३ पासून १९२० पर्यंत मोडी लिपीत विविध प्राथमिक शाळांमध्ये उपलब्ध आहेत.एवढ्या मोठ्या प्रमाणावरील नोंदींचे वाचन करणे, त्यातील कुणबी नोंदी शोधणे व त्या देवनागरीत लिहिणे हे मोठे आव्हान शेळके यांनी स्वीकारले व पूर्णही केले. प्रांताधिकारी गाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी वेळापत्रक बनवले.पाच दिवसांत रोज सुमारे वीस हजारांच्या सरासरीने त्यांनी मोडी नोंदी तपासल्या. त्यांनी रोज सकाळी सात ते सायंकाळी सात या वेळात हे काम केले. अथक परिश्रम करून शहर व ग्रामीण भागातील मोडी लिपीतील सुमारे दोन हजार कुणबी नोंदी शोधून काढल्या.या कामात त्यांना स्वामी मुक्तानंद विद्यालय प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक किरण जाधव यांचे सहकार्य लाभले. कुणबी नोंदी शोधण्यासाठी मिळालेला कालावधी अत्यल्प होता.

महिनाभर कालावधी मिळाल्यास तालुक्यातील अजूनही २० ते २५ टक्के कुणबी नोंदी सापडू शकतात. तसेच जिल्ह्यातही अजून नोंदी सापडू शकतात, असेही शेळके यांनी सांगितले.दरम्यान, मोडी वाचक शेळके व त्यांचे मित्र किरण जाधव यांनी प्रशासनास केलेल्या सहकार्याबद्दल त्यांना प्रशस्तीपत्रे देऊन गौरविण्यात आले.येथील पंचायत समितीत गटशिक्षणाधिकारी संजय कुसाळकर, विस्ताराधिकारी सुनील मारवाडी यांनी शेळके यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार केला. मराठा समाजातर्फे त्यांचा लवकरच सत्कार करण्यात येणार असल्याचे आंदोलक संजय सोमासे यांनी सांगितले.येथील नगरपालिका सर्वांत जुनी आहे. १८६३ पासून ते १९२० पर्यंत मोडी लिपीत दप्तर विविध प्राथमिक शाळांमध्ये उपलब्ध आहेत. हे दप्तर तपासण्याचे मोठे आव्हान प्रशासनापुढे होते. मात्र, मोडीलिपी वाचक सुरेश शेळके यांनी मेहनत घेऊन या लिपीतील नोंदणी शोधल्या व कुणबीची नावे प्रशासनाला उपलब्ध करून दिले. याचा अनेक कुटुंबियांना ओबीसी दाखला मिळण्यासाठी फायदा होणार आहे.-संजय कुसाळकर, गटशिक्षणाधिकारी, येवला

## ललित पाटील प्रकरणात ससूनमधील डॉक्टर, कर्मचारी रडारवर



पुणे : ससून रुग्णालयात घडलेले ड्रग्ज प्रकरण गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. या प्रकरणात दोषी असलेल्या पोलिसांवर कारवाई झाली. दोन जणांना बडतर्फ करण्यात आले. परंतु या प्रकरणात ससून रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचारी दोषी होते. त्यांच्यावर काहीच कारवाई झाली नाही. आता पुणे पोलिस ऍक्शन मोडवर आले आहेत. ललित पाटील याच्यावर उपचार करणारे अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांच्यासह ससूनमधील डॉक्टर, एक्स-रे तंत्रज्ञ, लेक्चरर यांची चौकशी सुरू केली आहे. त्यामुळे आता ससूनमध्ये काही दिवसांत मोठी कारवाई होण्याची शक्यता आहे.ललित पाटील याला ड्रग्ज प्रकरणात पुणे पोलिसांनी अटक केली होती. त्यानंतर तो तीन वर्षांपासून येरवडा कारागृहात होता. परंतु तीन वर्षांतून नऊ महिने त्याने ससूनमध्ये काढले. या ठिकाणी त्याला सर्व सुखसोयी मिळत होत्या. तो रुग्णालयातून फरार झाल्यानंतर पुणे पोलिसांवर टीका सुरू झाली. त्यानंतर त्याला मुंबई पोलिसांनी अटक केल्यामुळे त्याचे एक, एक प्रकरण समोर येऊ लागले. त्याला मदत करणारे सर्वच पोलिसांच्या रडारवर आले. ससूनमध्ये पुणे पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे. ललित पाटील याच्यावर उपचार करणारे डॉक्टर संजीव ठाकूर आणि त्यांच्या पथकातील डॉक्टरांची चौकशी सुरू केली आहे. पोलिसांनी गेल्या पंधरा दिवसांपासून गुप्तपणे ही चौकशी सुरू केली आहे. या चौकशीनंतर पोलिसांकडून मोठी कारवाई होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.ससून आणि कारागृह प्रशासनातील शीतयुद्ध ससूनचे अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांनी ललित पाटील याला उपचारासाठी ससून रुग्णालयात ठेवा, असे पत्र दिले होते. त्यानंतर आता कारागृह प्रशासनाचे पत्रही व्हायरल झाले आहे. त्यात कारागृह प्रशासनाने ललित पाटील याला उपचारासाठी तुमच्याकडे राहू द्या, असे म्हटले आहे.

## एकदा पदरात आरक्षण मिळू द्या, मग...; भुजबळांवरुन जरांगेंनी दिला अजित पवारांना इशारा



नेवासा : मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे सध्या महाराष्ट्र पिंजून काढत आहेत. आज त्यांनी अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा इथं सभा पार पडली. या सभेत त्यांनी पुन्हा मंत्री छगन भुजबळ यांना टार्गेट केलं. तसेच मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना त्यांना मराठ्यांविरोधात बोलणं टाळण्याबाबत तंबी द्यावी, अन्यथा सरकारला जड जाईल, असा इशारा देतानाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही इशारा दिला आहे.बलिदान वाया जाऊ द्यायचं नाही आरक्षणाची लढाई आपल्याला अशीच लावून धरायची आहे. २४ डिसेंबरपर्यंत आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागेल. आरक्षणासाठी मराठा बांधवांनी दिलेलं बलिदान वाया जाऊ द्यायचं नाही. ७० वर्षे मराठा नोंदी लपवून ठेवल्या गेल्या. आता नोंदी सापडल्या, मग इतकी वर्षे आरक्षण का दिलं नाही? असा सवाल यावेळी जरांगे यांनी केला. टोळ्या निर्माण करुन मराठ्यांना घेरण्याचा प्रयत्न आत्तापर्यंत आरक्षणाच्या लढाईत विजय जवळ आला की राजकीय नेते षडयंत्र करून ती लढाई यशस्वी होऊ देत नव्हते. पण आता आगामी हिवाळी अधिवेशन कालावधी वाढवण्यात आला आहे. बहुतेक मराठ्यांच्या आरक्षणासाठी तारीख वाढवली असेल. विजयाचा क्षण जवळ आलाय, गाफील राहू नका, अशी संधी पुन्हा मिळणार नाही. ही लढाई गोरगरीब मराठ्यांच्या लेकरांना न्याय मिळवून देण्यासाठी आहे.आरक्षण न मिळाल्यामुळं मराठयांचा नोकरीतील टक्का कमी झाला. इतर कुणाला आरक्षण द्यायचं झालं तर विरोध होत नाही. पण मराठ्यांना आरक्षण द्यायचा विषय आला की विरोध सुरू होतो. आज मराठे एक झालेत, मराठ्यांची अशी लाट आलीय की कुणालाच काही सुचेना. सर्व मराठे एकत्र आलेत, टोळ्या निर्माण करून मराठ्यांना चारही बाजूंनी घेरण्याचा प्रयत्न केला जात आहे, असंही जरांगे यावेळी म्हणाले.एकदा आरक्षण मिळू द्या मग...भुजबळांवर निशाणा साधताना जरांगे म्हणाले, एकदा आपल्या पदरात आरक्षण मिळू द्या, मग याच्याकडे पाहू. त्याला काय करायचं आहे, ते करू द्या. बोर्ड फाडायचे फाडू द्या, तुम्ही शांत राहा. मी कधीही अपमान सहन करत नाही, पण आरक्षणासाठी गप्प बसलोय. अपमान पचवला आहे, नाहीतर टप्प्यात आला की कार्यक्रम केलाच. या माणसाच्या लक्षात आलंय, मराठे आता आरक्षणात आले, म्हणून दंगली घडवण्याचा याचा प्रयत्न आहे. अजित पवारांना दिला इशारा आरक्षण मिळेपर्यंत शांत राहा. मुख्यमंत्री आणि अजितदादांना विनंती करतो की याला शांत बसवा, रोखा. त्यानं बोलायचं बंद करावं, आम्हीही बोलणार नाही. अजितदादांनी यामध्ये लक्ष घालावं, माझ्या जातीच्या पोरांना त्रास व्हायला लागला आहे. आम्ही आता सज्ज झालोय. तुम्ही याला रोखा, नुसती तंबी देऊ नका. एका बाजूने तुम्ही म्हणता आम्ही तंबी दिली आणि दुसऱ्या बाजूने पुन्हा सुरू होणार. याचा अर्थ याला तुमचंच पाठबळ आहे. नाहीतर हे सगळं सरकारला जड जाऊ शकतं, अशी शब्दांत यावेळी जरांगेंनी अजित पवारांनाही घेरलं.

## अमोल कोल्हे-अजित पवार भेटीमुळे तर्क-वितर्क

मुंबई (प्रतिनिधी) : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. अजितदादांच्या अँटीचेंबरमध्ये ही भेट झाली. मतदारसंघातील विकास कामांसंदर्भात आपण अजितदादांना भेटल्याचे अमोल कोल्हे म्हणाले मात्र अजित पवार गटाने दाखल केलेल्या कारवाईच्या पत्रात डॉ. कोल्हेंचे नाव नसणे आणि लगेचच झालेली ही भेट यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले. कोल्हे यांनी मात्र आपण शरद पवार यांच्या सोबतच आहोत. निवडणुकीतदेखील मतदारसंघातील जनता आणि शरद पवार जे सांगतील तेच करू, असेही डॉ. कोल्हे यांनी स्पष्ट केले.राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने अजित पवार गटाचे राज्यसभा खासदार प्रफुल्ल पटेल यांना अपात्र करण्याबाबतचे पत्र राज्यसभा सभापती जगदीप धनकड यांना लिहिले आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून अजित पवार गटानेही शरद पवार गटाच्या खासदारांना अपात्र करण्याचे पत्र दिले आहे मात्र त्यात डॉ. अमोल कोल्हे यांचे नाव मात्र समाविष्ट करण्यात आलेले नाही. या पार्श्वभूमीवर डॉ. अमोल कोल्हे यांनी मंत्रालयात येऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली.

# नांदेड, लातूर, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील १९ कुस्ती स्पर्धकांचा सहभाग

लातूर :- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, क्रीडा विभाग, कुस्ती प्रशिक्षण केंद्र, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २० ते २५ नोव्हेंबर २०२३ या कालावधीमध्ये अखिल भारतीय आंतर विद्यापीठ फ्रीस्टाइल व ग्रीको रोमन कुस्ती प्रशिक्षण निवड चाचणी शिबिर आयोजित करण्यात आहे.

या शिबिरात विजेत्या कुस्ती स्पर्धकांना तांत्रिक आणि शास्त्रशुद्ध कुस्तीचे प्रशिक्षण दिले जात आहे. या निवड चाचणी शिबिरात निवड झालेल्या कुस्ती स्पर्धकांच्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ फ्रीस्टाइल व ग्रीको रोमन कुस्ती स्पर्धा दि. २८ नोव्हेंबर ते ०१ डिसेंबर २०२३ या कालावधीमध्ये चंदीगड युनिव्हर्सिटी, मोहाली (पंजाब) येथे संपन्न होणार आहेत. या शिबिराला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई आणि उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांनी नुकतीच भेट देऊन विजेते कुस्ती स्पर्धक, पालक आणि प्रशिक्षकाचा सत्कार केला. यावेळी विचारमंचावर निवड चाचणी समिती सदस्य डॉ. मधुकर क्षिरसागर, डॉ. विठ्ठल डुमनर, पंच अण्णासाहेब मुळे, विष्णू भोसले, भरत कराड, शिवराज हाके, विष्णू तात्पुरे, प्रा. आशीष क्षीरसागर, पालक मकबूल सरनोबत, विजय मोरे आणि ईश्वर सिंग बावरी यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, मराठवाड्याने कुस्तीमध्ये एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.



स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड यांनी निवड चाचणी शिबिराची आमच्या महाविद्यालयाला संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल त्यांनी त्यांचे आभार मानून या प्रशिक्षणामध्ये कुस्ती खेळाडूंना तज्ञ प्रशिक्षकाच्या माध्यमातून उत्तम पद्धतीने मार्गदर्शक केले जाणार असल्यामुळे चंदिगड विद्यापीठ, मोहाली (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठीय कुस्ती स्पर्धेमध्ये आपल्या विद्यापीठाला सुवर्णपद प्राप्त होईल असा आशावादही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला. यावेळी प्रास्ताविक करताना उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे म्हणाले की, महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवसाय अभ्यासक्रम, समाजकार्य आणि संगणक या सहा शाखांमधून दर्जेदार व गुणात्मक शिक्षण दिले जाते. यामध्ये क्रीडा विभागाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. महाविद्यालयातील कुस्ती प्रशिक्षण केंद्रातून आजपर्यंत विविध पारितोषिक प्राप्त गुणवंत खेळाडूंना प्रशिक्षित करून त्यांनी महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला आहे असे सांगून उपस्थित सर्व प्रशिक्षक, शिक्षक, पालक, स्पर्धक यांचे त्यांनी अभिनंदन करून पुढील कार्याला हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आशिष क्षीरसागर यांनी केले तर आभार प्रा. विष्णू तात्पुरे यांनी मानले. यावेळी मुंतजीर सरनोबत, संकेत पाटील, ज्ञानेश्वर पाटील आणि अनुज पाटील या गुणवंत कुस्ती पटूंचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या निवड चाचणी शिबिरात ज्ञानेश्वर पाटील, ओकार मारतळे, अजय जाधव, हरीदास गायकवाड, संकेत पाटील, ऋषिकेश दूधभाते, ज्ञानेश्वर महानवर, गणेश साळुंके, योगीराज नागरगोजे, दीपक वडजकर, आकाश गड्डे, सय्यद अन्वर अहमद अली, सागर कदम, प्रल्हाद राठोड, विजय चव्हाण, अनुप पाटील, मुमताजजीर सरनोबत, प्रदीप गोरे आणि दलवीर सिंग बावरी आदि कुस्तीपटू सहभागी झाले आहेत.

# शासन आपल्या दारीतून कोट्यवधींचा खर्च!

मुंबई : प्रतिनिधी महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाकांक्षी आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा आणि विविध कारणांनी वर्षभरापासून पुढे ढकलत असलेला शासन आपल्या दारी उपक्रमाचा मुहूर्त अंतिम टप्प्यात आहे. या माध्यमातून सत्ताधारी थेट जनतेच्या दारी जाण्याचा प्रयत्न करीत आहेत. यातून लोकांना थेट विविध योजनांचा लाभ देऊन वेगळा उपक्रम राबविल्याचा संदेश पोचविण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. आता १ डिसेंबरला परळीत हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचा खर्च ५ कोटींच्या




घरात जाण्याचा अंदाज आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आदी प्रमुख मंत्र्यांच्या उपस्थितीत शासन आपल्या दारी हा कार्यक्रम होणार आहे.महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ एकाच छताखाली लाभार्थींना मिळावा, यासाठी शासन आपल्या दारी हा महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला. सुरुवातीला शिवसेना पदाधिकारी या कार्यक्रमासाठी आग्रही होते.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव २९ नोव्हेंबरपासून

लातूर : प्रतिनिधी क्रीडा व युवक सेवा उपसंचालक, लातूर जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा कृषी अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने २९ व ३० नोव्हेंबर रोजी जिल्हास्तर युवा महोत्सव २०२३-२४ चे आयोजन करण्यात आले आहे. लातूर येथील दयानंद सभागृहात हा महोत्सव होईल. युवकांचा सर्वांगिण विकास करणे, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त कला गुणांना वाव देणे व त्यांना एक खुले व्यासपीठ उपलब्ध करुन देणे हा या महोत्सवाचा उद्देश आहे.युवकांमार्फत तयार करण्यात आलेले हस्तकला, वस्त्र उद्योग, अग्रो प्रोडक्ट इत्यादी वस्तूंचे प्रदर्शनही यावेळी आयोजित केले जाणार आहे. युवा महोत्सवात सांस्कृतिक कला प्रकारामध्ये समूह लोकनृत्य (सहभाग संख्या १०), वैयक्तिक सोलो लोकनृत्य (सहभाग संख्या ५), लोकगीत (सहभाग संख्या १०), वैयक्तिक




सोलो लोकगीते (सहभाग संख्या ५) स्पर्धा होईल. कौशल्य विकास प्रकारात कथा लेखन (सहभाग संख्या ३), पोष्टर स्पर्धा (सहभाग संख्या २), वकृत्व स्पर्धा (इंग्रजी व हिंदी) (सहभाग संख्या २), फोटो ग्राफी (सहभाग संख्या २) या प्रकाराचा समावेश आहे. तसेच संकल्पना आधारित स्पर्धेत महाराष्ट्र राज्यासाठी तृणधान्य उत्पन्न वाढीसाठी विज्ञानाचा वापर (सहभाग संख्या ३५), सामाजिक विकासात विज्ञानाचे योगदान (सहभाग संख्या ५) आणि युवाकृतीमध्ये हस्तकला (सहभाग संख्या ७), स्त्री उद्योग (सहभाग संख्या ७), अग्रो प्रोडक्ट (सहभाग संख्या ७) इत्यादी कलाकृतीचे आयोजन करण्यात येणार आहे.लातूर जिल्ह्यातील उपरोक्त कला प्रकारामध्ये इच्छुक असणा-या युवक व युवतींनी आपली नावे २६ नोव्हेंबरपर्यंत कार्यालयीन वेळेत प्रत्यक्षात व ई-मेल आयडी वीश्ररींीशवळषारळश्र. ले वर नोंदवावीत. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील क्रीडा अधिकारी कृष्णा केंद्रे (भ्रमणध्वनी क्र. ९९७५५७६६००) यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे व जिल्हा कृषि अधिकारी शिवसांब लाडके यांनी केले आहे.

# कर्जफेडीसाठी शेतक-यांवर अवयव विकण्याची वेळ यावी हे महाराष्ट्राचे दुर्दैव

मुंबई (प्रतिनिधी) : सध्या शेतक-यांची अवस्था अत्यंत दयनिय झाली असून भाजपाच्या कार्यकाळात शेतकरी देशोधडीला लागला आहे. हिंगोली जिल्ह्यातील शेतक-यांनी कर्ज फेडण्याच्या विवंचनेतून अवयव विकायची तयारी दाखवली आहे. हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे; पण राज्यातील भाजप सरकारला त्याची लाज वाटत नाही, अशी प्रखर टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज केली.बँकेचे कर्ज



फेडण्यासाठी शेतक-यांनी किडनी, लिव्हर विकायला काढल्याची धक्कादायक घटना हिंगोलीत घडली आहे. किडनी ७५ हजार रुपये, लिव्हर ९० हजार रुपये व डोळे २५ हजार रुपयांना मिळतील, अशी जाहिरात सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. या बाबत बोलताना नाना पटोले यांनी भाजप सरकारवर टीकेची तोफ डागली. राज्यातील काही भागांत ओला दुष्काळ पडला आहे तर काही भागांत कोरडा दुष्काळ पडला आहे, शेतमालाला भाव नाही, सोयाबीन, कापूस, डाळी, कांद्यासह भाजीपाला व फळभाज्यांना भाव नाही, कर्जाचा डोंगर उभा आहे, पीक विम्याचे पैसे मिळत नाहीत आणि मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री मात्र शेतक-यांना भरघोस मदत केल्याच्या पोकळ घोषणा करीत आहेत.अवकाळीच्या नुकसानीची मदत अजून मिळालेली नाही, कर्जमाफीतील प्रोत्साहनपर ५० हजार रुपयेही अनेक शेतक-यांना मिळालेले नाहीत. सरकारचे अधिकारी-कर्मचारीच ५० पैशांची आणेवारी दाखवतात मग दुष्काळ कसा जाहीर करणार? सरकारने दुष्काळ जाहीर करण्यातही राजकारण केले.

# ५४९ कोटींचा शहर पाणीपुरवठा योजनेचा प्रकल्प अहवाल तयार


लातूर : प्रतिनिधी केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान २.० अंतर्गत लातूर शहराची २०५७ सालाची लोकसंख्या गृहीत धरुन लातूर शहर महानगरपालिकेने शहराकरिता पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डिपीआर) तयार करण्यांत आला असुन त्याची एकुण किंमत ५४९.३२४६ कोटी एवढी आहे. ही योजना मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असुन शहराकरिता योजना मंजुर झाल्यास पाणी पुरवठा बळकटीकरणाचे ध्येय व कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजनेची शाश्वती निर्माण होणार आहे. पाणी पुरवठा सुरळीत करण्यास यामुळे मदत होणार आहे. लातूर शहराला केज तालुक्यातील धरेगाव येथील मांजरा या मोठ्या प्रकल्पातून पाणी पुरवठा होतो. या धरणापासून हरंगुळ जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाईप लाईनद्वारे



रॉ वॉटर घेतले जाते. जलशुद्धीकरण केंद्रात पाणी शुद्ध करुन ते पाणी पाईप लाईनद्वारे शहरातील दहा ते बारा जलकुंभांना पुरवले जाते. जलकुंभावरुन शहराच्या त्या त्या भागात पाणी पुरवठा होतो. मांजरा प्रकल्पातून पाणीपुरवठयाला अडचण आली तर नागझरी बराज, साई बराजमधूनही काही प्रमाणात लातूर शहरासाठी पाणी घेतले जाते. केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान १.० अंतर्गत लातूर शहरातील पाणी पुरवठा योजना सक्षम करण्यात आली. शहरात काही ठिकाणी जलकुंभ उभारणे, जुन्या जलवाहिन्या काढून त्या ठिकाणी नव्याने जलवाहिन्या अंथरणे, शहराच्या विस्तारीत भागात जलवाहिन्या अंथरणे, नळाद्वारे पाणीपुरवठा योजना सक्षम करण्यावर भर देण्यात आला.अमृत अभियान २.० अंतर्गत लातूर शहराची २०५७ सालाची लोकसंख्या गृहीत धरुन लातूर शहर महानगरपालिकेने शहराकरिता पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डिपीआर) तयार करण्यांत आला असुन त्याची एकुण किंमत ५४९.३२४६ कोटी एवढी आहे. ही योजना मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहे. ही योजना मंजूर झाल्यास शहराच्या पाणी पुरवठा योजनेचे बळकटीकरण होणार आहे, अशी माहिती लातूर शहर महानगरपालिका पाणीपूरवठा विभागाच्या वतीने देण्यात आली.

# राज्य सरकारी कर्मचा-यांची डबल दिवाळी, महागाई भत्त्यात ४ टक्क्यांची वाढ

मुंबई (प्रतिनिधी) : केंद्रीय कर्मचा-यांच्या पाठोपाठ आता राज्य सरकारी कर्मचा-यांच्या महागाई भत्त्यात ४ टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे त्यामुळे सरकारी कर्मचा-यांच्या पगारात किमान ८०० ते अधिका-यांच्या पगारात ६ ते ८ हजार रुपये वाढ होईल, असा प्राथमिक अंदाज आहे.जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या प्रमुख मागणीसह राज्य सरकारी कर्मचारी व अधिका-यांच्या इतर प्रलंबित मागण्यांच्या संदर्भात २ दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली तर त्या पूर्वी काही दिवसांपूर्वी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख कर्मचारी संघटनांची बैठक झाली होती. केंद्र सरकारप्रमाणे राज्य सरकारी कर्मचा-यांच्या महागाई भत्त्यात १ जुलैपासून ४ टक्क्यांची वाढ करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या वतीने केली होती. ही मागणी मान्य करत राज्य सरकारने आज जीआर काढून सरकारी कर्मचा-यांना खूश केले



आहे.राज्य सरकारी कर्मचा-यांना सध्या ४२ टक्के महागाई भत्ता मिळत होता त्यात वाढ करून तो ४२ टक्क्यांवरून ४६ टक्के करण्यात आला आहे. ही वाढ १ जुलैपासून पूर्वलक्षी परिणामाने लागू होणार असून जुलै ते ऑक्टोबर या ४ महिन्यांची थकबाकी नोव्हेंबर महिन्याच्या पागरासोबत रोखीने मिळणार आहे. यामुळे सरकारच्या तिजोरीवर दर महिन्याला १८० ते २०० कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडणार आहे. निवृत्तीवेतनधारकांनाही मिळणार लाभ राज्य सरकारी कर्मचा-यांप्रमाणे सरकारी निवृत्तिवेतनधारक व कुटुंब निवृत्तिवेतनधारकांनाही महागाई भत्याचा लाभ मिळणार आहे. त्यांच्या मूळ निवृत्तिवेतनाच्या एकूण रकमेवर १ जुलैपासून चार टक्के महागाई भत्ता लागू करण्यात येणार आहे. ही वाढ १ जुलै, २०२३ पासूनच्या थकबाकीसह माहे नोव्हेंबर २०२३ च्या निवृत्तिवेतन व कुटुंब निवृत्तिवेतनासोबत रोखीने देण्यात येणार आहे. तसेच ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषी-कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये यांमधील निवृत्तिवेतनधारक व कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांनाही हा निर्णय लागू राहणार आहे.

# तुळशी विवाहाच्या साहित्यालाही महागाईचा फटका

लातूर : प्रतिनिधी दिवाळी संपताच तुळशी विवाहाचे वेध लागतात. कार्तिक शुक्ल एकादशीपासून तुळशी विवाह प्रारंभ होतो. यासाठी लागणारे साहित्य शहरातील बाजारपेठेत उपलब्ध झाले आहे. साहित्य खरेदी करण्यासाठी महिलावर्गाची लगबग सुरु झाली आहे. हिंदू धर्मामध्ये तसेच आयुर्वेदात औषधोपचारासाठी सर्वात बहुगुणी म्हणून मानल्या जाणा-या तुळशीला अधिक महत्त्व असते. तर दीपावलीत तुळशीला लेक मानून तिचा मोठ्या थाटामाटात विवाह केला जातो. यामुळे कन्यादानाचे पुण्य मिळते असा समज आहे. कार्तिकी शुक्ल एकादशीनंतर द्वादशीपासून या विवाहाला प्रारंभ होतो तर कार्तिकी पौर्णिमेस समाप्ती होते. यंदाही तुळशी विवाहाच्या साहित्याला महागाईचा फटका बसला आह.त्यामुळे तुळशी विवाहाच्या साहित्य खरेदीसह घराघरातील वृंदावनाची साफसफाई व रंगरंगोटी करण्यात महिला व्यस्त आहेत. तुळशी विवाह सोहळयाला यंदा शुक्रवार दि.२४ पासून प्रारंभ होत आहे. यासाठी लागणारे तुळशी रोप, लाल माती, रांगोळी, फुले, हार, बाशिंग, नारळ, तोरण आदी साहित्य बाजारपेठामध्ये उपलब्ध असून त्याच्या खरेदीसाठी शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या गंजगोलाईत ग्राहकांची झुंबड उडाली आहे. तूलशी विविहसाठी लागणा-या पूजेच्या साहित्याचे दर वाढले असले तरीही नागरिकांकडून मोठया संख्येने त्याची खरेदी सुरु असल्याचे किरकोळ विक्रेत्यांनी सांगितले आहे.भारतीय संस्कृतीमध्ये तुळशीच्या लग्नाची मोठी परंपरा आहे. तुळशीचे लग्न म्हणजे भगवान विष्णू आणि तुळस यांचा विवाह असतो. तुळशी विवाहानंतर ख-या अर्थाने लग्नसराईस प्रारंभ होतो. त्यामुळे दिवाळीनंतर येणा-या तुळशी विवाहाकडे अनेकांचे लक्ष लागलेले असते. तुळशी विवाहानिमित्त तुळशीची नवीन रोपे विकत घेतली जातात. घरोघरी तुळशी वृदावनाभोवताली फुलांची रांगोळी काढली जाते. तुळशीच्या या नव्या रोपाला नवीन लाल मातीत घालून त्याची रंगरंगोटी व तोरणे, पताके व फुलांनी सजावट केली जाते. आपल्याच घरातील एक लेक



समजूनच तुळशीला एका नवरीसारखे सजविण्यात येते. तुळशीच्या लग्नासाठी तुळशी वृंदावन, हळदी-कुंकू, फुले, हार, अक्षदा, बाशिंग, ऊस, चिंचा, बोरे, नैवेद्य फराळ किंवा पेढे आदी साहित्य लागते.त्यामुळे शहरातील बाजारपेठेत या साहित्याने सजली आहे. पूजा साहित्य तुळशीचे रोप २० ते ३० रुपये, तुळशी वृदांवन २५० ते ८५० रूपये, बाशगिं १०० ते ३०० रुपये, पूजेची ओटी ५० रुपये, नारळ २० ते २५ रुपये, फुले ३० ते ५० रुपयेकिलो, उस २० ते २५ रूपये एक तर उस जोडी ५० रूपये, कलर रांगोळी १० ते २० रूपये पाव, पुजेची सुपारी २ रूपये,पानांचा विडा ५० ते ६० रुपये याप्रमाणे शहरातील बाजारपेठेत तुळशीच्या विवाहासाठी आवश्यक पूजेच्या साहित्याची विक्रि केली जात असल्याचे किरकोळ व्यापारी ओम सुर्यवंशी यांनी सागीतले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE